| | | | |
|---|---|---|---|
| दाखल दिनांक | ०३ | ०२ | २०२० |
| नोंदणी दिनांक | ०३ | ०२ | २०२० |
| निकाल दिनांक | २९ | ०४ | २०२६ |
| **कालावधी** | **वर्षे** | **महिने** | **दिवस** |
| | **०६** | **०२** | **२६** |

| | |
|---|---|
| **MHYA050027282020** | **पुसद येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र. २ यांचे न्यायालयात**<br>**(पीठासीन अधिकारी – श्रीमती व्ही. डी. बिरहारी)**<br>–: **न्यायनिर्णय** :–<br>(घोषित दिनांक २९.०४.२०२६)<br>नि.फौ.ख.क्र.१३०/२०२०,**नि.क्र.–३५**<br>गु.र.नं.४९८/२०१९ ग्रामीण पोलीस ठाणे पुसद |
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन द्वारा<br>पोलीस निरीक्षक, पो. स्टे. ग्रामीण, ता. पुसद जि. यवतमाळ |
| अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता | श्री. के. ए. मुळे |
| आरोपी क्रं. १ | **जानु वसंता चव्हाण,**<br>वय – ४० वर्षे, व्यवसाय– मजुरी, |
| आरोपी क्रं २. | **हरीचंद बिबिशन चव्हाण,** |

| | |
|---|---|
| | वय – ४० वर्षे, व्यवसाय– मजुरी, |
| आरोपी क्रं. ३ | **मांगीलाल वसंता चव्हाण,**<br>वय – ४५ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>सर्व आरोपी रा. गंगानगर कवडीपुर,<br>ता.पुसद, जि.यवतमाळ. |
| आरोपी क्रमांक–१ ते ३ तर्फे विधीज्ञ | अॅड. श्री.ए.व्ही. राठोड |
| **भाग–ब** | |
| गुन्ह्याची तारीख | २२/१२/२०१९ |
| प्रथम खबर दिनांक | २३/१२/२०१९ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | ०३/०२/२०२० |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १६/१०/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २१/०१/२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | २९/०४/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्तता. |

## आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची | अधिनियम | निर्दोष मुक्त केले | दिलेली शिक्षा | सुनावणीदर म्यान |
|---|---|---|---|---|---|---|---|

निशाणी क्रमांक–३५

| | | | तारीख | | किंवा शिक्षा दिली | | जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी. सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **जानु वसंता चव्हाण,** | सुचनापत्रा वर सोडले | निरंक | भारतीय दंड संहिताचे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले | निरंक | निरंक |
| २. | **हरीचंद बिबिशन चव्हाण,** | सुचनापत्रा वर सोडले | निरंक | भारतीय दंड संहिताचे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले | निरंक | निरंक |
| ३. | **मांगीलाल वसंता चव्हाण,** | सुचनापत्रा वर सोडले | निरंक | भारतीय दंड संहिताचे कलम ३२४, | निर्दोष मुक्त केले | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ३२३, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अन्वये | | | |

## भाग – क

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोग

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | सौ.नगिता जानु चव्हाण | फिर्यादी |
| **ब.बचाव साक्षीदार, इतर** | | |
| **श्रेणी** | **नांव** | **पुराव्याचे स्वरुप** |
| डि.सा.क्र.१ | निरंक | निरंक |
| **क. कोर्ट साक्षीदार, इतर** | | |
| **श्रेणी** | **नांव** | **पुराव्याचे स्वरुप** |
| सी. सा.क्र.१ | निरंक | निरंक |

## अभियोगपक्षाचे/ बचाव/कोर्ट निशाणी

**अ.अभियोग**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | पी.१/पी.डब्ल्यु–१ | फिर्यादीची रिपोर्टवरील सही |
| **ब. बचाव** | | |
| **अनु. क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
| १ | निरंक | निरंक |
| **क. कोर्ट निशाणी** | | |
| **अनु. क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
| १ | ३२ | फिर्यादीचे वैद्यकिय प्रमाणपत्र |
| २ | ३३ | घटनास्थळ पंचनामा आरोपींनी मान्य केला. |
| ३ | ३४ | जप्ती पंचनामा |
| **ड. मुद्देमाल** | | |
| **अनु. क्र.** | **मुद्देमाल क्र.** | **तपशील** |
| १ | निरंक | निरंक |

## –: न्यायनिर्णय :–

## (घोषीत दिनांक २९ एप्रिल २०२६)

१) प्रस्तुत खटल्यात आरोपी क्रमांक–१ ते ३ विरुद्ध भारतीय दंड संहिताचे

कलम ३२३, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवून खटल्याची संपरिक्षा करण्यात आली.

**अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे**

२) अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात अशी की, फिर्यादी नामे सौ.नगिता जानु चव्हाण हिचे तिन महिन्यांपासून तिच्या पतीसोबत पटत नसल्याने माहेरी राहत होती. दिनांक २२.१२.२०१९ रोजी रात्री ८.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी तिची आई व भावजय जया असे फिर्यादीच्या पतीच्या घरी मुलतानवाडी, पुसद येथे गेल्या असता आरोपी क्रमांक–१ जानु वसंता चव्हाण हा फिर्यादीला शिवीगाळ करुन म्हणाला की, 'तु माझ्या विरुद्ध पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला, आता तु कशाकरिता माझ्या घरी आली' असे म्हणून फिर्यादीच्या डोक्यावर काठीने मारुन जखमी केले व आरोपी क्रमांक–१ हरीचंद बिबिशन चव्हाण व आरोपी क्रमांक–३ मांगीलाल वसंता चव्हाण यांनी फिर्यादीला लाथाबुक्याने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. तेवढ्यात फिर्यादीची आई व भावजय जया यांनी फिर्यादीच्या आरोपींच्या तावडीतुन सोडविले. त्यानंतर फिर्यादी, तिची आई व भावजय यांच्यासोबत आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन ग्रामीण, पुसद येथे गु.र.नं.४९८/२०१९ अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२३, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला.

३) तपासी अधिकारी पो.हे.कॉ.श्री.रामराव भिसु पवार ब.नं.१३ यांनी प्रस्तुत गुन्ह्याचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला व साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. त्यानंतर त्यांनी तपास पुर्ण करून सर्व आरोपींविरूद्ध या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४) सर्व आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिताचे कलम ३२३, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये ***निशाणी क्रमांक–२८*** प्रमाणे दोषारोप निश्चित केले. सर्व आरोपींनी गुन्हा नाकबुल केला व प्रस्तुत प्रकरणाची संपरीक्षा घेण्याची विनंती केली. त्यामुळे आरोपींविरुद्ध प्रस्तुतचा खटला पुढे चालविण्यात आला.

५) प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांच्या साक्षीवरुन आरोपींविरुद्धचे दोषारोप सिद्ध होईल असा सबळ पुरावा मिळून न आल्याने आरोपी क्रमांक–१ ते ३ यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदविण्यात आला नाही.

६) सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. के. ए. मुळे आणि आरोपींचे सुविज्ञ वकील अॅड श्री. ए.व्ही. राठोड यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. सर्व पुराव्याचे अवलोकन केले त्यावरुन खालील प्रश्न उपस्थित होतात. त्यास खालील कारणांस अनुसरुन निष्कर्ष नोंदविले.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने असे शाबित केले काय की, आरोपी क्रमांक–१ याने आरोपी क्रमांक–२ ते ३ सोबत दिनांक २२/१२/२०१९ रोजी रात्री ८.०० वाजताच्या सुमारास मुलतानवाडी, पुसद ता.पुसद जि.यवतमाळ येथे समान उदिष्ट ठेऊन संगनमताने फिर्यादीला लाकडी काठीने मारहाण करुन त्यांना इच्छापुर्वक शारीरिक साधी दुखापत केली आणि त्याद्वारे उपरोक्त आरोपींनी भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये अपराध केला? | **नाही.** |
| २. | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपी क्रमांक–१ ते ३ यांनी समान उद्देशाने फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण करुन त्यांना इच्छापुर्वक शारीरिक साधी दुखापत केली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिताचे कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये अपराध केला? | **नाही.** |
| | अभियोगपक्षाने असे शाबित केले काय की, उपरोक्त तारखेस वेळी व ठिकाणी आरोपी क्रमांक–१ ते ३ यांनी समान उद्देश ठेऊन संगनमताने फिर्यादीस शिवीगाळ करुन त्यांच्याकडुन | |

| | | |
|---|---|---|
| ३. | सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा त्याच्याकडुन कोणतातरी गुन्हा घडावा अशा उद्देशाने तिचा अपमान केला आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिताचे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये अपराध केला? | **नाही.** |
| ४. | अभियोगपक्षाने असे शाबित केले काय की, उपरोक्त तारखेस वेळी व ठिकाणी आरोपी क्रमांक–१ ते ३ यांनी समान उद्देश ठेऊन संगनमताने फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी देऊन फौजदारी पात्र धाकडपटशाचा गुन्हा केला आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिताचे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये अपराध केला? | **नाही.** |
| ५. | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## –: <u>का र ण मी मां सा</u> :–

७) अभियोगपक्षातर्फे आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्याकरीता केवळ 'एक' साक्षीदार तपासला आहे. साक्षीदार क्रमांक–१ सौ.नगिता जानु चव्हाण (फिर्यादी) यांची साक्ष ***<u>निशाणी क्रमांक–३१</u>*** वर नोंदविण्यात आली. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाल्याबाबत पुरसीस ***<u>निशाणी क्रमांक–३०</u>*** वर नोंदविण्यात आली आहे. तसेच, सहायक सरकारी अभियोक्ता यांनी अभियोगपक्षाचा

पुरावा ***निशाणी क्रमांक–१*** प्रमाणे बंद केला. अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे त्यांचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

**प्रश्न क्रमांक १ ते ४ करीता**

८) प्रश्न क्रमांक–१ ते ४ यावरील पुरावा एकसारखाच असल्याने हे सर्व प्रश्न एकत्रीतपणे विवेचनासाठी घेऊन त्यावरील निष्कर्ष नोंदविण्यात आले आहे.

९) अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक–१ सौ.नगिता जानु चव्हाण (फिर्यादी) यांची साक्ष ***निशाणी क्रमांक–३१*** वर नोंदविण्यात आली. तिने सरतपासादरम्यान कथन केले की, आरोपी तिचे पती आहेत. हरीचंद चव्हाण व मांगीलाल चव्हाण तिचे नातेवाईक आहेत. तिला घटना कधी घडली हे आठवत नाही. तसेच, तिला घटनेविषयी काहीही माहिती नाही. तिच्या पतीने तिला काठीने मारले व जखमी केले असे घडले नाही. सदर दिवशी तिची आरोपींसोबत बोलचाल झाल्यामुळे तिने रागाच्या भरात पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला होता. तिने फिर्यादवरील केवळ तिची सही निशाणी क्रमांक पी१/पी.डब्ल्यू१ मान्य केले व इतर मजकुर माहित नसल्याचे कथन केले.

१०) उपरोक्त साक्षीदार क्रमांक–१ फिर्यादी हिने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही त्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना भारतीय पुरावा कायदा,१८७२ चे कलम १५४ अन्वये उपरोक्त साक्षीदारास उलटतपासादरम्यान विचारता येतील असे

'सूचक प्रश्न' विचारण्यास परवानगी देण्यात आली. उलटतपासादरम्यान फिर्यादी साक्षीदार हिने आरोपीसोबत तिची कोर्टाबाहेर समझोता झाल्याचे मान्य केले आहे. तसेच, फिर्यादी साक्षीदार हिने त्यांना आरोपी जानु चव्हाण यांनी फिर्यादीला लाथाबुक्याने मारहाण केल्याचे व डोक्यावर काठीने मारल्याचे नाकारले आहे. तसेच, आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याचे देखील स्पष्टपणे नाकारले आहे. याव्यतिरिक्त अभियोगपक्षास उपरोक्त साक्षीदार यांच्या साक्षीमधील आरोपीवरील दोषारोप सिद्ध होईल असे काहीही निष्पन्न करता आले नाही. त्यामुळे उपरोक्त फिर्यादी साक्षीदार यांची साक्ष अभियोगपक्षास आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्याकरिता उपयुक्त ठरत नाही.

११) अभियोगपक्षाने दिलेल्या उपरोक्त पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादी साक्षीदार क्रमांक–१ हिने आरोपीवरील दोषारोप सिद्ध होईल असे काहीही कथन केले नाही. फिर्यादी व आरोपी हे एकाच कुटुंबातील सदस्य आहेत व ते आता एकत्र राहतात. तसेच, फिर्यादी हिने स्वतःच आरोपी व तिच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाल्याबाबत पुरसीस ***<u>निशाणी क्रमांक–३०</u>*** वर पुरसीस दिली व सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी निशाणी क्रमांक–१ वर अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला आहे. अभियोगपक्षातर्फे इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पंच

साक्षीदार व तपासी अधिकारी यांची साक्ष घेतली नाही. तसेच, फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र् ***निशाणी क्रमांक-३२,*** घटनास्थळ पंचनामा वरील ***निशाणी क्रमांक-३३*** **व जप्ती पंचनामा निशाणी क्रमांक- ३४** वर मान्य केला आहे परंतु, त्यावरुन केवळ हे सिद्ध होते की, घटनेच्यादिवशी घटनास्थळावर फिर्यादीला जखम झाली होती. परंतु, आरोपीनेच घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादीला लाकडी काठीने डोक्यावर मारहाण करुन जखमी केल्याचे, फिर्यादीला शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याचे सबळ पुराव्याअभावी सिद्ध होत नाही. उपरोक्त सर्व कारणास्तव, आरोपीने भारतीय दंड संहिताचे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ अन्वयेच्या घटकांनुसार अपराध केल्याची बाब अभियोगपक्षाने सबळ पुरावा देवून निर्विवादपणे व निसंशयपणे सिद्ध केली नाही. तसेच, फिर्यादी साक्षीदार हिने साक्षी पुराव्यामध्ये आरोपीसोबत न्यायालयाबाहेर समझोता झाल्याचे मान्य केले आहे. त्यामुळेच फिर्यादी साक्षीदाराने आरोपीविरुद्धचे दोषारोप सिद्ध होईल असे काहीही कथन केल्याचे दिसून येत नाही. फिर्यादी व आरोपी क्रमांक १ यांच्यात पती-पत्नीचे नाते असून त्यांनी त्यांच्यात न्यायालयाबाहेर समझोता झाल्याचे मान्य केले आहे. त्यांच्यातील संबंध चांगले राहावेत व ते पुढेही तसेच कायम राहावेत. म्हणून दोन्ही पक्षांनी न्यायालयाबाहेर आपसात तडजोडीने वाद मिटला असल्याने मान्य केले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात तपासण्यात आलेल्या उपरोक्त फिर्यादी साक्षीदार यांची साक्ष अभियोगपक्षास

आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी उपयुक्त ठरत नाही. त्यामुळे घटनेसंबंधीत घडलेल्या घटनांबाबत दाट संशय निर्माण होत असून आरोपीला संशयाचा फायदा देण्यात येतो व आरोपी या गुन्ह्यातून निर्दोष होण्यास पात्र असल्याच्या निष्कर्षापर्यंत मी पोहोचले आहे. उपरोक्त सर्व कारणास्तव मी ***प्रश्न क्रमांक–१ ते ४*** चे निष्कर्ष **नकारार्थी** नोंदवत आहे.

**प्रश्न क्रमांक ५ करिता**

१२) वरील सर्व साक्षी पुराव्यावे अवलोकन केले असता व प्रश्नांचे निष्कर्ष विचारात घेतले असता अभियोगपक्ष आरोपीविरुद्धचे दोषारोप सबळ पुराव्याद्वारे सिद्ध करु शकला नाही. तसेच, उपरोक्त साक्षी पुराव्यावरून घडलेल्या घटनेबाबत संशय निर्माण झाल्याने आरोपीला संशयाचा फायदा देण्यात येवून सर्व आरोपी हे निर्दोष असल्याच्या निष्कर्षापर्यंत मी पोहचले आहे. परिणामतः आरोपी हा निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. सबब, मी ***प्रश्न क्रमांक–५*** च्या उत्तराकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

| –: आदेश :– | |
|---|---|
| १. | **आरोपी क्रमांक–१ जानु वसंता चव्हाण, आरोपी क्रमांक–२ हरीचंद बिबिशन चव्हाण** व **आरोपी क्रमांक ३–मांगिलाल वसंता चव्हाण** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिताचे कलम ३२३, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपरांधामधुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| २. | आरोपी क्रमांक–१ ते ३ यांचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | प्रस्तुत गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल म्हणजेच एक आडजातीची काठी ही मुल्यहीन असल्याने अपिल कालावधीनंतर कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन नाश करावा. |
| ४. | आरोपी क्रमांक–१ ते ३ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७(अ) अन्वये वरिष्ठ न्यायालयात अपिल अथवा इतर अर्ज दाखल झाल्यास हजर राहण्यासाठी म्हणुन दाखल केलेले प्रत्येकी रक्कम रुपये १५०००/– (रुपये पंधरा हजार फक्त) चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपात्राची मुदत ६ महिने राहिल. |
| | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला).** |

**स्वा/–**

दिनांक २९.०४.२०२६

**(श्रीमती व्ही. डी. बिरहारी)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

(न्यायालय क्रं.२),पुसद, जि.यवतमाळ